Vyankatesha Arati

# ॥ श्री व्यंकटेश आरती ॥

शेषाचल अवतार तारक तूं देवा ।
सुरवरमुनिवर भावें करिती जन सेवा ॥
कमळारमणा असशी अगणित गुण ठेवा ।
कमळाक्षा मज रक्षुनि सत्वर वर द्यावा ॥ १॥

जय देव जय देव जय व्यंकटेशा ।
केवळ करुणासिंधू पुरवीसी आशा ॥ धृ ॥

हें निजवैकुंठ म्हणुनि ध्यातों मी तूतें ।
दाखविसी गुण कैसे सकळिक लोकांते ॥
देखुनि तुझें स्वरूप सुख अद्भुत होतें ।
ध्यातों तुजला श्रीपति दृढ मानस होतें ॥ जय ॥ २॥

इति

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated January 26, 1999